तात्काळ

क्र. पोमसं/४/७/१०/मु.पू.से.नि./सपोनि/१६२-२०१४ मुंबई, दि. ०७/११/२०१४

विषय : मूतदपूर्व सेवानिवृत्ती
वयाची ५०/५५ वर्षे पूर्ण झालेल्या किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांची त्यांना सेवेत राहाण्याची पात्रापात्रता विहित निकषानुसार अजमाविण्याच्या दृष्टीने पुर्नविलोकन - २०१४

। । । । ।

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतन) नियम, १९८२ च्या नियम १० (४) व नियम (६५) अनुसार सार्वजनिक हितास्तव अकार्यक्षम व संशयास्पद सचोटीच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना वयाच्या ५०/५५ व्या वर्षी पुर्नविलोकनाअंती निर्णय घेऊन त्यांना शासन सेवेतून मुदतपूर्व सेवानिवृत्त करावे, असे शासनाचे धोरण आहे. तसेच अशा प्रकारे मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्याचे अधिकार समुचित प्राधिकाऱ्यांना म्हणजेच नियुक्ती प्राधिकाऱ्यांना आहेत.

२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरसी-१०८५/१०२९/४३/पंधरा, दिनांक १२/०५/१९८६ नुसार वयाच्या ३५ व्या वर्षी सेवेत असलेल्या गट 'अ' व 'ब' वर्गाच्या अधिकाऱ्यांचे वयाची ५० वर्षे पूर्ण होते वेळी किंवा त्यांच्या अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होते वेळी यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी तसेच, वयाच्या ३५ व्या वर्षानंतर सेवेत दाखल झालेल्या अधिकाऱ्यांचे वयाच्या ५५ व्या वर्षी असे एकदाच पुर्नविलोकन करण्यात येते. गट 'क' व 'ड' कर्मचाऱ्यांच्याबाबतीत वयाच्या ५५ व्या वर्षी किंवा त्यांच्या अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होतेवेळी यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी पुर्नविलोकन करण्यात येते.

३. त्याअनुषंगाने शासन सेवेत लोकहितास्तव राजपत्रित अधिकाऱ्यांना / अराजपत्रीत कर्मचाऱ्यांना सेवेत चालू ठेवावे किंवा मुदतपूर्व सेवानिवृत्त करावे, याची पात्रा-पात्रता तपासण्यासाठी उपरोक्त शासन परिपत्रक, सा.प्र.वि. दिनांक १२/०५/१९८६ आणि दिनांक १/४/१९८९ नुसार खालीलप्रमाणे निकष विहित करण्यात आले आहेत.

(अ) शारीरिक क्षमता
(ब) निर्विवाद सचोटी व
(क) चांगला पेक्षा कमी नाही असा अभिलेख

४. वर नमूद प्रमाणे ५० वर्षे तसेच ५५ वर्षे वयानंतर शासकीय सेवेत ठेवण्याविषयीच्या पात्रापात्रतेबाबतच्या तपासणीच्या अनुषंगाने, सहायक पोलीस पोलीस निरीक्षकांच्या संवर्गातील मुदतपूर्व सेवानिवृत्तीची प्रकरणे पोलीस उपनिरीक्षकांप्रमाणे (तेव्हाच्या) परिक्षेत्रीय पोलीस उपमहानिरीक्षकांच्या अधिपत्याखालील पुर्नविलोकन समितीने तपासावीत आणि जे सहायक पोलीस निरीक्षक वयाच्या ५५ व्या वर्षापुढे अथवा ३० वर्षाच्या अर्हताकारी सेवेच्यानंतर शासकीय सेवेत ठेवण्यास अपात्र ठरतील, अशा सहायक पोलीस निरीक्षकांची प्रकरणे सोबतच्या विवरणपत्र-अ मधील माहितीसह व त्यांच्या गोपनिय अहवाल नस्तीसह आणि पुर्नविलोकन समितीच्या कार्यवृत्तासह या कार्यालयास मंजूरीसाठी पाठवावीत, अशा सूचना पोलीस महासंचालकांच्या क्र. पोमसं/३-अ/५२८८/९४, दिनांक ३०/०३/१९९४ च्या परिपत्रकान्वये सर्व घटक प्रमुखांना तसेच तेव्हाचे परिक्षेत्रीय पोलीस उप महानिरीक्षकांना देण्यात आल्या आहेत. त्याची प्रत सोबत सुलभ संदर्भासाठी जोडली आहे.

२/-

५. सहायक पोलीस निरीक्षकांचे पद शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पीएमएन-०२९७/सीआर-४७४/ पोल-५ब, दिनांक २६/२/२००४ अन्वये प्रशासकीय बाबींसाठी जरी राजपत्रीत "ब" वर्गातील ठरविण्यात आले असले तरी या कार्यालयाच्या उपरोक्त दिनांक ३०/०३/१९९४ च्या परिपत्रकातील सूचनानूसार सर्व पोलीस आयुक्त आणि परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षकांनी त्यांच्या अध्यक्षतेखालील पुर्नविलोकन समितीमार्फत अशा प्रकरणी छाननी केलेल्या सहायक पोलीस निरीक्षकांची सन-२०१४ ची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रात भरुन या कार्यालयास दिनांक २०/११/२०१४ पर्यंत कृपया न चुकता पाठवावी. त्यांच्या आयुक्तालयाची / परिक्षेत्राची माहिती निरंक असल्यास कृपया निरंक अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

६ निशस्त्र / राखीव पोलीस उप निरीक्षकांच्या बाबतीत पुर्नविलोकन आढाव्याबाबत सर्व पोलीस आयुक्तांनी तसेच परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षकांनी अशा प्रकारे त्यांचे स्तरावरुन कार्यवाही करुन त्यांचा स्वतंत्र अहवाल या कार्यालयाकडे पाठवावा.

(अतुलचंद्र कुलकर्णी)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (शहरे / लोहमार्ग)
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

प्रत,

महासंचालक, ओ.सी.बी., महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण / नाहसं / वाहतूक / दविप / लोहमार्ग / विशेष कृती, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, विसुवि, मुंबई / फोर्स वन, मुंबई / नक्षल विरोधी अभियान, नागपूर
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

२. वर नमुद अधिकाऱ्यांनी कृपया त्यांच्या विभागातील (मूळ पदातील) सहायक पोलीस निरीक्षक / (मूळ पदातील) पोलीस उप निरीक्षकांच्या पुर्नविलोकनाबाबत सदर परिपत्रकातील सूचनाप्रमाणे त्यांचे कार्यालयाचे स्तरावरुन त्वरीत कार्यवाही करुन त्याबाबतची माहिती दिनांक १०/११/२०१४ पर्यंत या कायालयाकडे पाठवावी.

अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, मुंबई
संचालक, पोलीस बिनतारी संदभ विभाग, म.राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, पुणे / रा.रा.पो.बल, पुणे व नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा / लोहमार्ग / बिनतारी संदेश / विशेष कृती दल, नागपूर)
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे,
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १६
प्रचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण विद्यालय, नाशिक

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी /-
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. ५ व ५-अे

निशस्त्र सहायक पोलीस निरीक्षक संवर्गातील ५०/५५ वर्षे पूर्ण झालेल्या किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झालेल्या सहायक पोलीस निरीक्षक यांना सेवेत राहण्याची पात्रा-पात्रता विहित निकषानुसार अजामविण्याच्या दृष्टीने पुर्नविलोकन.

विवरणपत्र - अ

| अ. क्र. | सपोनिचे नाव | जात व मागास प्रवर्ग | मागास प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे / नाही सादर केले असल्यास त्याचा क्रमांक | जन्म तारीख (सेवा पुस्तकातील नोंदी प्रमाणे) | सेवानिवृत्त दिनांक | पोशि<br>पोना<br>पोह<br>सपोउपनि<br>नेमणूक | पोउनि<br>सपोनि<br>नेमणूक | ५०/५५ वर्षे पूर्ण झालेल्या किंवा शासकीय सेवेत ३० वर्षे पूर्ण झालेला दिनांक | शारीरीक दृष्टया सेवेमध्ये राहण्यास पात्र आहे काय ? | निवडसमितीने गोपनीय अहवालांची केलेली प्रतवारी | | | | | सरासरी प्रतवारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | ०८-०९ | ०९-१० | १०-११ | ११-१२ | १२-१३ | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

क्रमांक: पोमसं/३-अ/५२८८/९४ मुंबई, दि. 30.3.९४

विषय :- सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या मुदतपूर्व सेवानिवृत्तीची प्रकरणे पुनर्विलोकन करण्याबाबत.

*******

परिपत्रक :

शासनाने त्यांचा निर्णय गृहविभाग क्र. पीएस-०३९१/सीआर-२७२/पोल-५ अ, दिनांक ७.११.९२ अन्वये महाराष्ट्र पोलीस दलामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या १५०० पदांचा संवर्ग निर्माण केला आहे. ही पदे वर्ग २ ची [राजपत्रित] धरण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठविण्यात आला असून त्यावर शासनाचे आदेश प्रलंबित आहेत. त्यामुळे शासनाचे आदेश प्राप्त होईपर्यंत सदर पदे वर्ग ३ म्हणून धरण्यात येत आहेत. सहाय्यक पोलीस निरीक्षकाच्या मुदतपूर्व सेवानिवृत्तीची प्रकरणे पोलीस उपनिरीक्षकांच्या प्रकरणी ज्याप्रमाणे पोलीस उपमहानिरीक्षकांच्या अधिपत्याखाली पुनर्विलोकन समितीमार्फत तपासण्यात येतात त्याप्रमाणेच तपासण्यात येऊन जे सहाय्यक पोलीस निरीक्षक वयाच्या ५५ वर्षापुढे अथवा ३० वर्षाच्या अर्हताकारी सेवेच्या पुढे त्यांना सेवेत ठेवण्यास अपात्र ठरतील अशाच सहाय्यक पोलीस निरीक्षकांची प्रकरणे विहीत प्रपत्रातील माहिती व वर्षांच्या गोपनीय अहवाल नस्तीसह व समितीच्या कार्यवृत्तासह या कार्यालयास मंजूरीसाठी पाठवावीत.

[ के. पी. रघुवंशी ]
सहाय्यक पोलीस महानिरीक्षक [ आस्थापना ]
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

- महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई [माहिती करिता]
- सर्व पोलीस आयुक्त
- आयुक्त व वि.पो.म.नि., मु.अ.वि. [मु.वा.], महाराष्ट्र राज्य, मुंबई.
- अपर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे], म.रा. पुणे.
- विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई
- सर्व पोलीस उपमहानिरीक्षक
- संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा. पुणे.
- संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
- सर्व पोलीस अधीक्षक
- सर्व पोलीस प्रशिक्षण शाळा
- सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.

प्रत सविनय अग्रेषित :

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.